# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-20.04.2026 वार- सोमवार

---

**भरणे**

“यंदाच्या हवामान अंदाजानुसार एल निनोचा प्रभाव असण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून त्याचा शेती क्षेत्रावर होणाऱ्या संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीकपद्धतीचे नियोजन करावे, त्यामुळे येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, यादृष्टीने आवश्यक सुक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या वितरक आणि दुकांनदारावर कारवाई करावी”, असे निर्देश राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज दिले. पुण्यात आज छत्रपती शाहू संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था अर्थात सारथीच्या सभागृहात खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनसंदर्भात आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

**स्वीकृत सदस्य**

अनेक वर्षांपासून बंद असलेली जिल्हा परिषदेमधील स्वीकृत सदस्य नियुक्तीची पद्धत आता पुन्हा सुरू झाली असून याबाबतच्या अध्यादेशावर राज्यपालांची स्वाक्षरी झाली आहे. राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर अधिकृत अध्यादेश जारी झाला असून या निर्णयामुळे इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये नव्या राजकीय संधींसाठी चढाओढ सुरू झाली आहे.

**प्रकाशन**

देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंचं दर्शन घडविणाऱ्या विविध लेखांचे संकलन असलेल्या ‘भारताची प्रतिभा’ या पुस्तकाचं प्रकाशन आज राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं. पुणे परिवार तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला स्वतः प्रतिभताई पाटील, कुलगुरू सुरेश गोसावी उपस्थित होते.

**दीक्षित**

“मी उच्च शिक्षण घेणारच, नवरा माझ्या पसंतीचाच असणार, हुंडा देणार नाही, कुटुंब छोटे ठेवणार, मी नोकरी किंवा व्यवसाय करणारच आणि मुलगा-मुलगी असा भेद करणार नाही, अशी प्रतिज्ञा द एम्पॉवर हर फाउंडेशनच्या वतीने आर्थिकदृष्ट्या दत्तक घेण्यात आलेल्या मुलींनी घ्यावी,” असा सल्ला इतिहास तज्ज्ञ डॉ. राजा दीक्षित यांनी दिला. ‘द एम्पॉवर हर फाउंडेशन’च्या वतीनं लेखिका स्व. सुजाता भागवत लिखित ‘विस्मृत वीरांगना’ या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

**उदय सामंत**

“शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' ही लोकचळवळ सुरु झाली आहे. पुण्यातील नागरिकांना या कक्षाचा चांगला लाभ होईल आणि शिवसेनेची सामान्य लोकांप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट होईल," असं प्रतिपादन राज्याचे उद्योग आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केलं आहे. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचं उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**हेल्प रायडर्स**

वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकांना मार्ग मोकळा करून देणे, अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणे तसेच आपत्कालीन प्रसंगी मदतीसाठी धावून जाणे ही पुण्यातील  हेल्प रायडर्स संस्थेची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी ठरली आहे. संस्थेतर्फे पुण्यात ६ जून २०२६ रोजी “संजीवनी जीवनरक्षक पुरस्कार–२०२६” सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

**संपाचा इशारा**

राज्यातील सरकारी, निमसरकारी तसच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात ‘राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीनं  उद्या, २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा दिला आहे. यामध्ये नर्सेस असोसिएशन सहभागी होणार असल्यानं ससून रुग्णालयामधील परिचारिका संपावर जाणार आहेत. जुन्या निवृत्तिवेतन योजनेची अंमलबजावणी करावी, परिचारिकांची रिक्त पदे भरावीत, ट्यूटरची पदोन्नती कराव्यात, सेवानिवृत्तीचं वय ५८ वरून ६० करावं या प्रमुख मागण्या संघटनेने केल्या आहेत.

**परवाने**

पॉस प्रणाली आणि प्रत्यक्षात असलेल्या युरिया साठ्यामध्ये तफावत आढळल्यानं  जिल्ह्यातील १५ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. शेतकऱ्यांनी निलंबित केलेल्या विक्रेत्यांकडून खत न घेण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. परवाना निलंबित करण्यात आलेल्या दुकानदारांमध्ये सात जण दौंड तालुक्यातील आहेत.

**अपहार**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अंदाजपत्रकात बोगस उपसूचनांच्या आधारे तरतुदींमध्ये फेरफार करून ठेकेदारांना ५२ कोटी रुपयांची देयकं अदा केली असून  मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी ही देयकं  बँकेतून रोखल्याची खोटी माहिती देऊन आयुक्तांचीही दिशाभूल केली, असा गंभीर आरोप स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी आज पत्रकार परिषदेत केला. या प्रकरणावरून महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी  संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

**भोसले**

‘येस बँक’ आणि ‘दिवाण हाउसिंग फायनान्स लिमिटेड’च्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा न्यायालयात सुरू असलेल्या दाव्यात बांधकाम व्यावसायिक अविनाश भोसले आणि त्यांच्याशी संबंधित कंपन्यांना दिलासा मिळाला आहे. अंमलबजावणी संचालनालयाचे तात्पुरत्या जप्तीचे आदेश न्यायाधिकरणाने रद्द केले आहेत.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 39  तर किमान तापमान 23  पूर्णांक 09 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. तर बहुतांश भागात अंशतः ढगाळ हवामान होतं. उद्याही याच स्वरूपाचं तापमान आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतसह, नमस्कार.**